# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**


**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी प्राचार्य/अध्यापक/विद्यापीठ अध्यापक/महाविद्यालयीन, परिसंस्थातील विभागप्रमुख यांच्या मतदार याद्या तयार करण्याच्यादृष्टीने ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**जाहिर प्रकटन**

संदर्भ क्र. १. साफुपुविनि/१२५ दि. १४.०९.२०१७.
२. साफुपुविनि/१४१ दि. २९.०९.२०१७.
३. साफुपुविनि/१४४ दि. ०६.१०.२०१७.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये प्राचार्य, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये विद्यापीठ अध्यापक व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांची विद्यापीठातील विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणीसाठी जाहिर प्रकटन संदर्भ क्र. साफुपुविनि/१२५ दि. १४.०९.२०१७ रोजी प्रसिध्द करुन मतदार याद्या तयार करण्यासाठी शुक्रवार, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ ते शुक्रवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात आलेले होते. तसेच सदर अर्जाची प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयास सादर करण्यासाठी शुक्रवार, दि. ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती.

त्यानंतर जाहिर प्रकटन संदर्भ क्र. साफुपुविनि/१४१ दि. २९.०९.२०१७ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्राचार्य, महाविद्यालयीन/ परिसंस्थांतील अध्यापक, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक व महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांची विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने मतदार नोंदणीची मुदत **शुक्रवार, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत** वाढविण्यात आलेली होती. सदर अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **शुक्रवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७** पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७ येथे कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येणार होती.

तद्नंतर जाहिर प्रकटन संदर्भ क्र. साफुपुविनि/१४४ दि. ०६.१०.२०१७ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्राचार्य, महाविद्यालयीन/ परिसंस्थांतील अध्यापक, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक व महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांची विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने मतदार नोंदणीची मुदत **शुक्रवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१७ पर्यंत** वाढविण्यात आलेली होती. सदर अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **शुक्रवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७** पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७ येथे कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येणार होती.

..२..

या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्राचार्य, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक व महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांची विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने मतदार नोंदणीची मुदत **गुरुवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ ते बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत** वाढविण्यात आलेली आहे. सदर अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७** पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७ येथे कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येणार आहे.

आपली माहिती संदर्भ क्र. साफुपुविनि/१२५ दि. १४.०९.२०१७ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रकटनामध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार **गुरुवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ ते बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत**, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या दरम्यान संकेतस्थळावर ऑनलाइन पध्दतीने **(http://bcud.unipune.ac.in)** भरावयाची आहे. संकेतस्थळावर नोंदविलेली माहिती त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे स्व-साक्षांकित केलेल्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी **शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७** पर्यंत, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या निवडणूक विभागास खास दुतामार्फत पाठवावयाची आहेत. या तारखेनंतर माहिती प्राप्त झाल्यास, माहिती अपूर्ण असल्यास किंवा आवश्यक त्या कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची पूर्तता केलेली नसल्यास अशा नावाचा संबंधित मतदार यादीत समावेश केला जाणार नाही व त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

याबाबत काही शंका/अडचणी असल्यास **teacher-techsupport@pun.unipune.ac.in** या e-mail id वर संपर्क साधावा.

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/२३८
दिनांक : १५/११/२०१७

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Notifiacation.docx